माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य, माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**

**तक्रार क्रमांक : २२/२०२१**

**तक्रारकर्ता, श्री. आकाश संजयराव खोब्रागडे,**

**--विरुध्द--**

**जन माहिती अधिकारी, रचना सहायक, बांधकाम विभाग प्रमुख,**
नगर परिषद गडचिरोली, ता. जि. गडचिरोली

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
नगर परिषद गडचिरोली, ता. जि. गडचिरोली

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २२.०२.२०२३**

| | | |
|---|---|---|
| **तक्रारकर्ता** | : | उपस्थित |
| **जन माहिती अधिकारी** | : | उपस्थित |
| **प्रथम अपीलीय अधिकारी** | : | उपस्थित |

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| १३.०२.२०२० | --- | २०.०१.२०२१ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र. १३७८/२०१९, दिनांक १३.०२.२०२० रोजी पारीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. सदर तक्रारीवर दिनांक २२.०२.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, नगर परिषद गडचिरोली श्री. गिरीशकुमार टिकाराम वैद्य उपस्थित आहेत. व प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद गडचिरोली जि. गडचिरोली श्री. सुर्यकांत पिकाकट उपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय (अपील क्र. १३७८/२०१९) मध्ये दिनांक १३.०२.२०२० रोजी सुनावणी घेवून " जन मुख्याधिकारी नगर पालिका गडचिरोली यांनी तात्काळ अपिलार्थीची तक्रार निकाली काढून माहिती तयार

करावी व जन माहिती अधिकारी म्हणून अपिलार्थीस माहिती प्रदान करावी व अनुपालन आयोगास सादर करावे. मुख्याधिकारी, नगर परिषद गडचिरोली यांनी महाराष्ट्र विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम १० नुसार अपिलार्थी यांचा दि. २३.०८.२०१८ चा तक्रार अर्ज विहीत वेळेत निकाली काढला नाही म्हणून जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी त्यांच्याविरुध्द जबाबदारी निश्चित करावी, कार्यवाही करावी व त्याबाबतचा अनुपालन अहवाल ३० दिवसाचे आत आयोगास सादर करावा ,." या आदेशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात आले आहे.

सदर द्वितीय अपीलावरील आदेशास अनुसरुन तक्रारकर्ता यांनी दिनांक २०.०१.२०२१ रोजी कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली. सदर तक्रारीवर आज रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. अपिलार्थी यांनी व्दितीय अपिल क्र. १३७८/२०१९ मध्ये दिनांक १३.०२.२०२० रोजी पारित आदेशानुसार मुख्याधिकारी ,नगर पालिका ,गडचिरोली यांनी तात्काळ अपिलार्थीची तक्रार निकाली काढून माहिती तयार करावी व जन माहिती अधिकारी म्हणून अपिलार्थीस माहिती प्रदान करावी व अनुपालन आयोगास सादर करावे. मुख्याधिकारी, नगर परिषद गडचिरोली यांनी महाराष्ट्र विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम १० नुसार अपिलार्थी यांचा दि. २३.०८.२०१८ चा तक्रार अर्ज विहीत वेळेत निकाली काढला नाही म्हणून जिल्हाधिकारी ,गडचिरोली यांनी त्यांच्याविरुध्द जबाबदारी निश्चित करावी असे आदेशित करण्यात आले. त्यावर जिल्हाधिकारी ,गडचिरोली यांच्या वतीने तत्कालिन प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद श्री. संजीव ओहोळ यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन साप्रवि क्र. केंमाअर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, मंत्रालय दिन ३१ मार्च २००८ नुसार कलम १९ (८) (ग) व २० (२) अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्याची शिफारस केलेली आहे. त्यांची प्रत प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना प्रत संलग्न करुन पुढील आवश्यक कार्यवाही करण्यासाठी सादर केले आहे. त्यानुषंगाने आयोगाच्या आदेशाचे अनुपालन अहवाल आयोगास सादर केले. आयोगाने दि. १३.०२.२०२० रोजी दिलेल्या निर्देशानुसार अपिलार्थी यांच्या दि २३.०३.२०१८ रोजीच्या अर्जावर केलेला कार्यवाहीबाबत तसेच नियमातंर्गत कायद्याचा तपशिल अपिलार्थी यांना सादर केला. आयोगाने पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन मुख्याधिकारी नगर परिषद, गडचिरोली यांच्याकडून झाले आहे. सबब, प्रस्तुत तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**(राहुल भा. पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण-नागपूर**
**दिनांक - २२.०२.२०२३**

जा.क्र. 2894 दि. 12 MAY 2023

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
★ नागपूर ★

E:\SS/ तक्रार 22.02.2023\22-2021 आकाश खोब्रागडे.docx